प्रेसनोट दि.२२/०३/२०१९

# दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर

## हरवलेले मुल पोलीसांच्या प्रयत्नातुन आईच्या ताब्यात

साहेब माझा मुलगा सापडला आता मला काही तक्रार करायची नाही हे वाक्य एका घाबरुन गेलेल्या आईचे आहे. दि.२१/०३/२०१९ रोजी एक महिला वय-२६ वर्षे रा. पर्वती दर्शन पुणे या आपला मुलगा वय-साडेतीन वर्ष याच्या बरोबर काका हलवाई स्विटमार्ट या दुकानात घरगुती साहित्य खरेदी करण्या करीता गेल्या होत्या तेव्हा त्यांचा मुलगा हा आईचा हात सोडुन दुसरीकडे भरकटला त्याच्या आईने त्याला सर्व परिसरात शोधले परंतु तो काही मिळुन आला नाही. दत्तवाडी पोलीस स्टेशनचे पर्वती बिट मार्शल कर्मचारी पो.कॉ.दयानंद कांबळे व पो.कॉ. विष्णु सुतार हे पंचमी हॉटेल सातारा रोड या परिसरात बिट पेट्रोलिंग करत असताना हा रडणारा मुलगा त्यांना मिळुन आला. त्याच्याकडे त्यांनी चौकशी केली असता त्याने आपले नाव सांगितले राहण्याचा पत्ता व इतर माहिति त्याला सांगता न आल्याने त्यांनी या मुलास पर्वतीदर्शन पोलीस चौकी येथे सहा. पोलीस निरीक्षक शंकर सलगर यांच्या समक्ष हजर केले व सर्व घटना सांगितली. पर्वतीदर्शन परिसरात या मुलाची माहिती पोलीसांनी सर्व भागात जावुन नागरीकांना दिली व काही वेळाने एका महिलेचा मुलगा हरवल्याचे त्यांना समजले त्याप्रमाणे सदर महिलेस व त्याची आजी यांना बोलावुन त्या मुलाची व्यवस्थित माहिती घेवुन आईच्या व आजीच्या ताब्यात दिले. हरवलेले मुल त्याच्या आईच्या ताब्यात सुखरुप पोहचविण्यास दत्तवाडी पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यशस्वी झाले. सदर महिलेने आपल्या मुलाला पोलीसांनी विना विलंब शोधुन दिले त्याबद्दल त्यांचे आभार मानले.

हि कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांच्या मार्गदर्शना खाली सपोनि शंकर सलगर, पोना नवनाथ राणे, पो.कॉ. विष्णु सुतार, दयानंद कांबळे व भारत आस्मर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

